# प्रेस नोट

## शिरवळ मधिल जबरीचोरी करणारे सराईत गुन्हेगार टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई

(सातारा शहरातील जबरीचोरी (चैनस्नॅचिंग) करुन, दहशत करुन सराईतपणे गुन्हे करणारे सराईत टोळीवर मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई )

सर्व सामान्य लोकांना, महिलांना खाजगी सावकारीव्दारे, (जबरीचोरी) चैनस्नॅचिंग, दरोडा, खंडणीसाठी दहशत निर्माण करुन, टोळी जमवून, स्वत:चा आर्थिक फायदा करुन घेणारे गुन्हेगारीला आळा बसावा यासाठी पोलीस अधीक्षक, संदीप पाटील व अपर पोलीस अधीक्षक, विजय पवार यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे सध्या सातारा जिल्ह्यातून संघटित गुन्हेगारीवर अंकुश लावण्यासाठी मोक्का अंतर्गत कारवाईचे सुरु आहेत. सातारा शहरातील व जिल्ह्यातील प्रमोद उर्फ खंड्या धाराशिवकर, महेंद्र तपासे,अमित उर्फ सोन्या देशमुख, आकाश खुडे, शेखर गोरे, आशिष जाधव व अनिल कस्तुरे यांच्या अशा एकुण ७ टोळ्यांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे. सातारा जिल्ह्यामध्ये जबरीचोरी,दरोडा,खंडणी सारखे गुन्हे करणारे गुन्हेगारांच्या आनखी काही टोळ्या पोलीस अभिलेखावर असून सामान्य लोकांना, महिलांना जोर जबरदस्ती करुन दहशत करुन दागिने,रोखरक्कमेची जबरी चोरी करणारे सराईत गुन्हेगार यांचे कारवायांवर स्थानिक गुन्हे शाखा,सातारा चे श्री.पद्माकर घनवट व शिरवळ पोलीस स्टेशनचे, पोलीस निरीक्षक, श्री बी.एन.पाटील असे लक्ष ठेवून होते.

दि.२७.०४.२०१७ रोजी १९.१५ वा.चे सुमारास फिर्यादी, त्यांची सुन, नात व त्यांच्या घराशेजारील महिला ह्या केदारेश्वर मंदिराजवळुन शिरवळमधील बाजारपेठेत निघाल्या होत्या. तेव्हा केदारेश्वर मंदिराशेजारील डांबरी रोडच्या उतारावर तिन अनोळखी इसम एका मोटार सायकलवरुन त्यांचे दिशेने आले. व फिर्यादी यांच्या जवळ पोहोचताच मागे बसलेल्या इसमाने फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याचे गंठण जबरदस्तीने हिसका मारुन तोडुन चोरल्यानंतर दोघेही मोटार सायकलवरुन तेथुन पळुन गेले होते. वगैरे मजकुरच्या खबरी जबाबावरुन गुन्हा नोंद होता. सदरचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेने उघड करुन टोळी प्रमुख आरोपी १. चंद्रकांत उर्फ चंदर लक्ष्मण लोखंडे, मुळगाव-ढवळ, ता.फलटण, जि.सातारा सध्या रा.फिनिक्स रिबेरिनो, शिर्के पेपर मिलजवळ, शिरवळ, ता.खंडाळा, जि.सातारा, व सदस्य २. निलेश बाळासो निकाळजे, व्यवसाय-गुरांचा डॉक्टर, रा.सोनगाव, ता.फलटण, जि.सातारा, ३.अक्षय शिवाजी खताळ, रा.बिबि, ता.फलटण, जि.सातारा हे आरोपी निष्पन्न केले होते.

गुन्ह्याच्या तपासामध्ये टोळी प्रमुख याचे व त्याचे टोळी विरुद्ध त्याचेवर व त्याचे टोळी सदस्यावर शिरवळ, लोणंद,फलटण ग्रामीण,खंडाळा,सातारा शहर, सातारा तालुका, कळंबोली (जि.रायगड), पनवेल (जि.रायगड ) या ठिकाणी दरोडा, दरोड्याची तयारी, बलात्कार, जबरी चोरी, घरफोडी, चोरी या सारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झालेने व सदरच्या टोळीचा प्रमुख हा आपले व आपले टोळीतील सदस्यांचा आर्थिक फायदा करण्यासाठी दरोडा, दरोड्याची तयारी, बलात्कार, जबरी चोरी, घरफोडी, चोरी या सारखे गुन्हे करुन टोळी चालवत असल्याचे निष्पन्न झाले होते.

मा.पोलीस अधीक्षक, सातारा यांनी दिले सुचनांप्रमाणे शिरवळ पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये टोळी प्रमुख चंद्रकांत उर्फ चंदर लक्ष्मण लोखंडे व त्याचे टोळीतील सदस्य साथीदार यांनी दहशत करुन जबरीचोरी केली असल्याचे निष्पन्न झालेने श्री बी.एन.पाटील, पोलीस निरीक्षक, शिरवळ पोलीस स्टेशन यांनी या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियमान्वये प्रस्ताव मा. पोलीस अधीक्षक, श्री.संदीप पाटील व मा.अपर पोलीस अधीक्षक, श्री.विजय पवार यांच्या मार्फत मा.श्री विश्वास नांगरे पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर यांचेकडे पाठविलेला होता.

सदर मोक्का प्रस्तावास मा.श्री विश्वास नांगरे पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर यांनी मंजुरी दिली असून सदरचा गुन्ह्याचा पुढील तपास श्री. रमेश चोपडे, उप विभागीय पोलीस अधिकारी, फलटण विभाग फलटण हे करीत आहेत. नागरीकांनी या टोळीच्या स्थावर व जंगम मालमत्तेची काही माहिती असल्यास पोलीसांना द्यावी तसेच या संघटित टोळी विरुद्ध काही तक्रारी असल्यास संबंधीत पोलीस स्टेशनला दाखल कराव्यात असे आवाहन करण्यात येत आहे.

आगामी काळात सातारा जिल्ह्यातील दहशत करुन जबरीचोरी करणारे आनखी टोळ्यांविरुद्ध मोक्का कायद्यान्वये कारवाई करण्यात येणार आहे.

पोलीस अधीक्षक सातारा,करीता

Scanned by CamScanner